


नंदिनी देशमुख

# आज अचानक

# आज अचानक

(एकांकिका)

नंदिनी देशमुख

ई साहित्य प्रतिष्ठान

आज अचानक

(aaj aachanak)


लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

9004094617



प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : २२ जानेवारी २०१५



©esahity Pratishthan®2015

❖ या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ही एकांकिका

"स्वतःच्या सुखाचा विचार न करता समाजकार्याला वाहून घेणाऱ्या सर्व स्त्रियांना"

आदरपुर्वक अर्पण

नंदिनी देशमुख

एकांकिका

# आज अचानक...

लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh @gmail.com

या एकांकिकेचे पूर्ण अधिकार लेखिकेच्या स्वाधीन आहेत. या एकांकिकेचा प्रयोग करावयाचा असल्यास लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# <u>आज अचानक</u>

## <u>प्रवेश पहिला</u>

(पडदा उघडतो तेव्हा गार्गी देवेंद्र पुराणिक टेबल खुर्चीवर बसून काम करतांना दिसत आहेत. गार्गी पुराणिक समाजशास्त्राच्या प्राध्यापिका आणि सामाजिक कार्यकर्त्या, गंभीर चेहरा, करारी व्यक्तिमत्व, त्या व्यक्तिमत्वाला साजेसा पोशाख, कॉटनची साडी किंवा ड्रेस, चष्मा.  समोर टेबलवर बरीच पुस्तके आहेत. त्यांचे laptop वर काम चालू आहे. मधूनच एखादे पुस्तक काढतात, laptop मधे बघतात, मधून मधून टिपणे काढतात. तेवढ्यात
घरचा टेबलवरचा फोन वाजतो )

गार्गी:- हैलो … डॉ. गार्गी पुराणिक हिअर … हो… हो, बोला, बोला …हो, काय? अपॉइंटमेंट घ्यायची आहे? कशासाठी? कोरड्या उलटया होत आहेत, दोन महिने झाले आहेत? एक मिनिट, एक मिनिट, माझे  ऐका आधी थोडे !

अहो, मी डॉक्टर आहे पण ‘तशी’ डॉ. नाही. तशी म्हणजे तुम्ही समजता तशी नाही. मी पीएच. डी. आहे. कुणाला संपर्क करायचा असेल तर आधी खात्री करून घ्यावी आणि मगच फोन करावा. काय? फोन केल्याशिवाय कसे कळणार? हो … हो…

बरोबर आहे तुमचे, पण आता कळलय ना? मग ठेवा आता फोन. रॉंग नंबर आहे. (रागाने फोन खाली ठेवते.)  शी ssss, किती डिस्टर्ब होतो कामाच्या मध्ये मध्ये असे फोन आले की …

(पुन्हा फोन वाजतो)

गार्गी:- हैलो, अहो, सांगितलंय न तुम्हाला एकदा रॉंग नंबर आहे म्हणून. कोण बोलताय? ओह .... हं, बोला काय काम आहे? डॉ. गार्गी बोलतेय. काय काम आहे तुमचं? अहो, माझी मुलाखत घ्यायला मी काही फार मोठा तीर नाही मारला. चीनला आंतरराष्ट्रीय महिला परिषद आहे, मला अमुक अमुक पारितोषिक मिळाले, पण म्हणून माझे काम नाही थांबले काही. ते सुरूच राहणार आहे. आणखी खूप खूप काही करायचय मला. हे बघा असे मुलाखत वगैरे द्यायला नाही आवडत मला. हो... पण तुमचा एवढा आग्रह का? ठीक आहे पण मी दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ नाही देणार. काय? इथेच खालीच आहात तुम्ही माझ्या घराच्या? तुम्हाला एवढा कॉंफीडन्स होता? ठीक आहे या. पण फक्त दहाच मिनिट हं ! मला खूप कामे आहेत.

(डॉ. गार्गी पुन्हा कामात बिझी आहे. थोड्याच वेळात एक तरुण मुलगी प्रवेश करते. दिसायला सुंदर, तरुण, गोड, नाजूक. पंजाबी ड्रेस. हातात पर्स. )

मोहिनी:- आत येवू का?

गार्गी :- (प्रश्नार्थक चेहऱ्याने तिच्याकडे बघते.) आता कोण आणखी?

मोहिनी:- मॅडम, मी आत्ता फोन केला होता ना...

गार्गी:- ओह! तुम्ही ... माझ्या घराच्या खाली थांबला होता त्याच का? या ...

मोहिनी:- इश्श्य! ये म्हणालात तरी चालेल.

गार्गी:- तू मुलाखतच घ्यायला आली आहेस ना?

मोहिनी:- हं ... हो... हो. मला तुमची मुलाखत हवी आहे. काय काय करता तुम्ही?

गार्गी:- तुला माहित नाही? मग तू मुलाखत काय घेणार माझी? कुठून आलीस तू? म्हणजे कुणाकडून? कशासाठी हवी आहे तुला माझी मुलाखत?

मोहिनी:- हो... हो...

गार्गी:- अगं, हो हो काय करतेस? काही तरी मासिक, संस्था वर्तमानपत्र असे काही

असेल ना? का नुसत्याच सुंदर मुली बघून ठेवतात कामाला?

मोहिनी:- नाही … नाही … मला माहित आहे सगळे. तुम्ही समाजशास्त्राच्या प्राध्यापिका आहात. महाराष्ट्र शासनाने तुम्हाला आदिवासी भागातील महिलांचा सर्व्हे करायला सांगितला आहे. त्याचा अहवाल तुम्ही लौकरच प्रसिध्द करणार आहात. आणि आता चीनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेसाठी तुमची निवड झाली आहे. तिथे तुम्ही तुमचा …

गार्गी:- बस … बस. बरं, तू काही प्रश्नावली वगैरे आणली आहेस का?
आणली असलीस तर सांग. म्हणजे पटकन उत्तरे देवून मोकळे होता येइल.

मोहिनी:- नाही. प्रश्नावली नाही. मला वाटते आपण सहज मनमोकळ्या गप्पा मारू आणि त्यातूनच मला काय पाहिजे ते मी घेईन.

गार्गी:- ठीक आहे. मलाही आवडेल तुझ्यासारख्या सुंदर मुलीशी गप्पा मारायला.
(आणि मनाशीच म्हणते 'आणि निर्बुध्द' ) हं … बोल ….

मोहिनी:- तुमचा विषय काय मॅडम?

गार्गी:- अगं, आत्ता तूच म्हणालीस ना की तुम्ही समाजशास्त्राच्या प्राध्यापिका आहात. महाराष्ट्र शासनाने तुम्हाला आदिवासी भागातील महिलांचा सर्व्हे करायला सांगितला आहे. त्याचा अहवाल तुम्ही लौकरच प्रसिध्द करणार आहात म्हणून?

मोहिनी:- माफ करा मॅडम. माझे काही चुकत असेल तर. पण तुम्ही जो अहवाल वाचणार आहात, तो नेमका कशाबद्दल आहे?

गार्गी:- 'आदिवासी भागातील महिलांवर होणारे लैंगिक अत्त्याचार ' असा माझा विषय आहे. विषय थोडा वेगळा आणि नाजूक आहे. त्याची संख्याशास्त्रीय माहिती मी गोळा केली आहे.

मोहिनी:- कित्ती अवघड काम ना? पण खरंच मला, म्हणजे आम्हाला सगळयांनाच

तुमचे खूप कौतुक वाटते, अभिमानही वाटतो. तुमचे काम, तुमच्या कामाचा झपाटा,चोवीस तास असे कामाला वाहून घेणे ...

गार्गी:- पण मी काही विशेष करतेय असे मला नाही वाटत. लहानपणापासून हे बाळकडू पाजल्या गेलय मला. आता ते सगळे मुरलेय माझ्यात. माझ्या वडिलांची इच्छा होती की मी खूप शिकावे, मोठी व्हावे, काहीतरी भरीव कार्य करावे. म्हणून तर त्यांनी माझे नाव गार्गी ठेवले. खरंच... नाही आवडत मला हे असे चारचौघांसारखे साधेसुधे जीवन.

मोहिनी:- म्हणजे?

गार्गी:- आदिवासी निदान आदिवासी तरी आहेत. त्यांना शिक्षण नाही, सुविधा नाहीत. पण आपल्या आजूबाजूच्या बायका बघा ना. चूल आणि मूल याशिवाय दुसरे काही सुचते का यांना? आपली स्वतःची उन्नती व्हावी, समाजासाठी काहीतरी करावे अशी कधी इच्छा होते का त्यांना? लग्न होवून मूल झाले की त्यातच स्त्रीच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे, असे अजूनही या एकविसाव्या शतकातल्या स्त्रियांना वाटतेच ना? स्त्रियांनी अगदी एका ठराविक चाकोरीतच जीवन जगले पाहिजे असे काही आहे का?

मोहिनी:- मॅडम... मॅडम, खरेच आहे तुमचे. तुमची तळमळ, तुमची जिद्द, तुमची धडाडी मला समजते. बसा ना मॅडम, शांत व्हा थोडे. मी पाणी आणू का तुमच्यासाठी?

गार्गी:- अगं, तू माझ्याकडे आली आहेस, पाणी मी तुला द्यायला हवे. मी तुला विचारायला हवे. पण माझा स्वभावच थोडा वेगळा आहे.

(आतून पाणी घेवून येते)

मोहिनी:- मला कल्पना आहे मॅडम.

गार्गी:- काय कल्पना आहे? हेच ना की मी तुसडी आहे, माणूसघाणी आहे. लोकांशी फटकून वागते. पण खरे सांगू? मला नाही आवडत कोशात गुरफटून घ्यायला. मला मनापासून जे करावेसे वाटते तेच मी करते, म्हणून तर ....

मोहिनी:- म्हणूनच तर तुमच्या कामात तुम्ही एवढे यश मिळवलेत, एवढे नाव कमावलेत. आणि कोण म्हणते तुम्हाला चार लोकात राहायला आवडत नाही, लोकात मिसळायला आवडत नाही? तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांच्या किती आवडत्या आहात हे माहितीये मला. तुमचा स्वभाव ना फणसासारखा आहे. वरून कडक दिसता, फटकन बोलता पण आत माया आहे.

गार्गी:- अरे वा, बरीच माहिती गोळा केलीस माझ्याबद्दल. ...

मोहिनी:- मॅडम, आदिवासी समाजाचा अभ्यास करण्यासाठी, त्या लोकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी तुम्ही त्यांच्या भागात जावून राहताच ना? त्यांच्यात मिसळताच ना? तिथे या सगळ्या सुखसोयी मिळत नाहीत तरी सुध्दा ....

गार्गी:- तेच तर ... मी आपल्या पांढरपेशा समाजात मिसळत नाही. सगळ्या सुखसोयी सोडून कुठेतरी वणवण भटकते. विद्यार्थ्यांना मी आवडते का नाही ते मला माहित नाही पण बाकी इतर सगळ्या फालतू गोष्टींपासून मी चार हात दूर असते ...

मोहिनी:- इतर चार गोष्टींपासून म्हणजे ... इतर ॲक्टीव्हीटीज म्हणायचंय का तुम्हाला? मॅडम, एक खासगी प्रश्न विचारू?

गार्गी:- माझ्या खासगी आयुष्यात कुणीही नाक खुपसलेले मला आवडत नाही.

मोहिनी:- नाही. मी कुठेही तुमच्या खासगी आयुष्याचा उल्लेख करणार नाही. सहज एक कुतूहल म्हणून ....

गार्गी:- कुतूहल? कशाचे? वाऱ्यावर सोडलेली म्हणून आजूबाजूच्या बायका माझी हेटाळणी करतात, मला माहित आहे. पण मी दूर्लक्ष करते कारण मी काय करते आणि मला काय करायचंय हे मला नक्की ठाऊक आहे.

मोहिनी:- पुराणिक सर सुध्दा ....?

गार्गी:- छे... छे ... (एकदम इमोशनल होते) तो खूप चांगला आहे. देवेंद्रचा माझ्या या कामाला कधीच विरोध नव्हता. त्याने मला नेहमीच समजून घेतले. आमच्यात काहीही मतभेद नाहीत.

मोहिनी:- पण मी तर असे ऐकले आहे की पुराणिक सर आणि तुम्ही ....

गार्गी:- वेगळे राहता, असेच ना?

मोहिनी:- हो ... म्हणजे ....

गार्गी:- हो. राहतो आम्ही वेगळे. त्यात काय मोठंसं? भाऊ भाऊ वेगळे राहतात. वडील आणि मुलगा-मुलगी, आई आणि मुलगा-मुलगी वेगळे राहतात. मग नवरा बायको जर वेगळे राहिले तर त्याचा एवढा बाऊ का? त्यांच्यामध्ये भांडण असेल तरच त्यांनी वेगळे रहावे का?दुसऱ्या गावी नोकरी असेल तर वेगळे राहतातच ना? आणि एकत्र राहूनही जर एकमेकांशी पटत नसेल तर?

मोहिनी:- म्हणजे तुमचे आणि सरांचे पटत नाही का?

गार्गी:- मी म्हणाले का तसे काही? (स्वतःच्याच नादात) आमच्या लग्नाला चार वर्ष झाली पण अजून एकदाही आमचे भांडण झाले नाही. देवेंद्र एक आदर्श नवरा आहे. त्याचे माझ्यावर खूप प्रेम होते.

मोहोनी:- होते?

गार्गी:- अं .... नाही म्हणजे आहे, असेलच ...

मोहिनी:- मॅडम, ... (पाण्याचा ग्लास तिच्या हातात देते)

गार्गी:- मोहिनी, तू प्रेम केलंस कुणावर?

मोहिनी:- (लाजते) हं ... म्हणजे हो... नाही ... म्हणजे ....

गार्गी:- लाजतेस? म्हणजे करत असावीस. तू जर कुणावर प्रेम करत असशील ना तर जीव तोडून कर. तुझे सर्वस्व त्याला अर्पण कर. त्याच्याशी एकरूप हो. असे माझ्यासारखे करू नकोस.

मोहिनी:- माझ्यासारखे म्हणजे? तुमचे सरांवर प्रेम …

गार्गी:- -प्रेम आहे पण आणि नाही पण. खरंच देवेन्द्रवर मी प्रेम करते का? मला का प्रेम करता येत नाही कुणावर? अशी कशी मी कोरडी? ….

(मोहिनी तिच्याकडे डोळे विस्फारून बघत आहे.)

मोहिनी:- मॅडम, काय … काय बोलताय तुम्ही?

गार्गी:- खरे तेच बोलतेय. देवेंद्र मला आवडतो. तोही मला खूप जपतो. पण … पण त्याच्यासारखे प्रेम मला नाही करता येत गं …

(एकदम थोडीशी थांबते)

मोहिनी:- बोला, मॅडम बोला … बोला ना! तुमच्या आत, मनात काय आहे ते बोला. तुमच्या खासगी गोष्टी मी कुणालाही काहीही सांगणार नाही. खरंच …

गार्गी:- आईच्या माघारी बाबांनी मला वाढवले, मोठे केले. मला ते त्यांचा मुलगाच म्हणायचे. मुलासारखेच कपडे घालायचे. दागिने मला आवडत नाहीत. नटावे, मुरडावे वाटत नाही. मला झपाटून टाकले ते अभ्यासाने आणि आता या कामाने. सतत त्या आदिवासी लोकांचे दारिद्रय, त्यांचा अडाणीपणा, त्यांचे होणारे हाल डोळ्यासमोर दिसत असतात आणि असे वाटते की काय अधिकार आहे आपल्याला हे असे सुखी जीवन जगण्याचा? अपराधी वाटत राहतं गं. आणि मी जे बघते तो तर समाजाचा एक छोटासा भाग आहे. असे किती लोक असतील?

मोहिनी:- मॅडम... किती मोठ्या मनाच्या आहात तुम्ही. किती मोठे समाजकार्य करताय तुम्ही. तुमच्यासमोर आम्ही एकदम लहान आहोत. पण देवेंद्र सर ...

गार्गी:- देवेन्द्र...! काय केलंय मी त्याच्यासाठी? मी सतत अशी झपाटल्यासारखी माझ्याच जगात वावरत असते. तो एक सालस, हळवा, मनमिळावू, प्रेमळ स्वभावाचा माणूस आहे. पण साध्या सुखी संसाराची त्याची इच्छाही मी पूर्ण करू शकले नाही.

मोहिनी:- म्हणजे? मॅडम सरांचं आणि तुमचं ...? एक विचारू?

(गार्गी आपल्याच तंद्रीत आहे.)

मोहिनी:- मी असं ऐकलय की तुम्ही डिव्होर्स घेणार आहात. तुमच्या या समाजकार्याला त्यांचा, त्यांच्या घरच्यांचा, त्यांचा काही विरोध...?

गार्गी:- नाही, नाही. देवेंद्र आणि त्याच्या घरचे सगळे खूप चांगले आहेत पण मीच त्यांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. खरे तर त्या दिवशी तसे काही घडले नसते तर कदाचित ....

(हळूहळू अंधार पडतो. प्रवेश पहिला समाप्त)



## प्रवेश दुसरा

(रंगमंचावर प्रकाश पडतो तेव्हा प्रा. देवेंद्र पुराणिक आरामात सोफ्यावर बसून गाणी ऐकत आहेत. हातात कॉफीचा कप आहे. त्या गाण्यांबरोबर ते स्वतःही गाणे गुणगुणतात. तेवढ्यात फोन वाजतो )

देवेंद्रः- हैलो, प्रा. देवेंद्र पुराणिक बोलतोय. अरे अविनाशजी, बोला. अं, नाही गार्गी मॅडम आल्या नाहीत अजून. नाही, तिचे काही सांगता येत नाही किती वेळ लागेल आणि केव्हा येईल ते. आमचं काय ! चाललय आपलं. गॅदरिंग जवळ आलंय. नाटक बसवतोय एक. तालमी चालू आहेत. नाही नाही आज नाही गेलो. आई बाबा आलेले आहेत. ते ना? हो... हो, ते गावीच असतात. पहिल्यांदाच आले आहेत इथे. पण आमचे हे असे ... गार्गी तिच्या कामात बिझी, आम्ही आमच्या कामात. अरे ... छोड ना यार, गार्गीशी काय काम आहे ते सांग. कसला कार्यक्रम म्हणालास? हो का? तिच्या हाताने त्या विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश आणि पुस्तके वाटायची आहेत का? हो, ठीक आहे ना, मी सांगतो तिला निरोप. पण तू सुध्दा एखाद्या तासाने फोन कर. तू मात्र एक चांगला कार्यकर्ता तयार झालास हां ... पार्टी खूप जोरात आहे सध्या तुझी. चल ठेवतो. ओ. के. बाय ...

(पुन्हा त्याचे गाणे ऐकणे, मधेच एखादे पुस्तक, मासिक चाळणे सुरूच आहे. घरात जावून डीशमध्ये काहीतरी खायला घेवून येतो. तेवढ्यात गार्गी येते. दमून कोचावर बसते. देवेंद्र तिला पाणी आणून देतो. )

देवेंद्रः- दमलीस खूप! कशाला धावपळ करतेस एवढी? कॉफी करून आणू का गरम गरम कडक?

गार्गी:- आईबाबा केव्हा आले? काय करताहेत?

देवेंद्र:- आई बाबा ना? दुपारीच आले. मावशींनी स्वयंपाक करून ठेवला होता. जेवण केलं, आराम केला आणि आता सुलूआत्याकडे गेले आहेत.

गार्गी:- बरे आहेत ना? तब्येत वगैरे ...

देवेंद्र:- बरे आहेत. पण तुझी भेट न झाल्यामुळे आई नाराज झाली थोडी.

गार्गी:- अरे, थांबणे शक्य नव्हते मला. मी तुला आधीच म्हणाले होते ना ...

देवेंद्र:- अगं हो. मी सांगितलं तिला समजावून. पण मी काय म्हणतो गार्गी ...

गार्गी:- मला माहित आहे तू काय म्हणणार आहेस ते. पण मी स्पष्टच सांगते तुला. मला माझ्या कामातून थोडीशीही उसंत मिळणार नाही, त्यामुळे ...

देवेंद्र:- कामे तर काय आपली नेहमीचीच आहेत गं. पण आपले लग्न झाल्यापासून आईबाबा पहिल्यांदाच आपल्याकडे आले आहेत.

गार्गी:- हो, पण त्यांना कल्पना आहे ना माझ्या कामाची? हे बघ देवेंद्र, मला आईबाबांबद्दल आदर आहे, पण ....

देवेंद्र:- पण आपुलकी नाही. कारण तू त्यांच्या सहवासात राहिलीच नाहीस कधी.

गार्गी:- तसं नाही रे. पण समजून घ्यायला पाहिजे ना. माझे बाबा आल्यावर बघ बरं, सगळं आपलं आपलं करून घेतात. जेवतात, खातात, आराम करतात, फिरतात.

देवेंद्र:- तुझ्या बाबांची आणि माझ्या आईबाबांची तुलना करू नकोस.

गार्गी:- तुलना नाही. मी सांगतेय तुला.

देवेंद्र:- आणि मी पण तुला बरेचदा सांगत आलोय. (त्याचा आवाज थोडा चढलाय. पण आपला आवाज चढलाय हे लक्षात आल्यावर तो एकदम थांबतो आणि शांतपणे म्हणतो ) थांब. तू आत्ताच बाहेरून दमून आलीस. मी तुझ्या साठी कॉफी करून आणतो. तू फ्रेश हो. आपण बोलू निवांत.

(गार्गी फ्रेश होण्यासाठी आत जाते. देवेंद्र कॉफी करण्यासाठी आत जायला निघतो तेवढ्यात देवेंद्रचा फोन वाजतो.)

देवेंद्र:- हैलो, बाबा … हं, बोला. गार्गी आली आहे आत्ताच. काय? तुम्ही जेवूनच येणार तिकडून? उशीर होईल का यायला? हो तेही बरोबर आहे म्हणा, एवढ्या दिवसानंतर भेटलात, सुलूआत्या तरी जेवल्याशिवाय कशी येवू देईल? हो … हो … ठीक आहे. बरं ठेवतो.

(आत जातो. गार्गी टॉवेलने तोंड पुसत बाहेर येते. काही पत्रं वगैरे आली आहेत का ते बघते. एक पाकीट हातात घेवून वाचते. एकदम हातातला मोबाईल बघते. देवेंद्र तिच्या साठी कॉफी घेवून बाहेर येतो. )

देवेंद्र:- बाबांचा फोन आला होता. ते आत्याकडून जेवूनच येणार आहेत. त्यांना घरी यायला उशीर होईल रात्री.

गार्गी:- देवेंद्र, अरे हे बघ. मी तुला म्हणाले होते ना मला माझ्या प्रबंधाच्या कामासाठी गडचिरोलीला जायचय म्हणून. हे बघ. हेमलकसाहून पत्र आलंय … प्रकाश आमटेंच. ओ गॉड, आत्ता पुन्हा मेल पण आलाय. मी याच गोष्टीची आतुरतेने वाट बघत होते कधीपासून. आणि उद्याच निघावे लागेल मला सकाळीच.

देवेंद्र:- अगं, उद्या कसे जाता येईल?

गार्गी:- अरे, प्रकाश आमटे कुठेतरी जाणार आहेत परवा. त्यानंतर केव्हा येणार आहेत माहित नाही. त्यामुळे तर त्यांनी पुन्हा तातडीने मेल केलाय ना. त्यांची भेट होणे महत्वाचे आहे. त्यामुळे मला उद्या सकाळी निघावेच लागेल.

देवेंद्र:- अगं पण तुझी आणि आईबाबांची अजून भेट सुध्दा झाली नाही. शिवाय ते आता रात्री उशिरा घरी येणार आहेत. जेवूनच येणार आत्याकडून. आत्ताच फोन आला होता त्यांचा. तू बाथरूममध्ये होतीस. विचारत होते तुझ्या बद्दल.

गार्गी:- अरे, प्रकाश आमटेना,त्यांच्या कुटुंबियांना भेटायचंय. कित्ती मोठे काम करतात ते. ते सगळं बघायला मिळेल. तशी लहानपणी बाबांबरोबर मी एकदा गेले होते. बाबा आमटेना भेटायला ... पण आता किती व्याप वाढलाय त्यांचा. त्यांची मुलं, त्यांच्या सुना ...

देवेंद्र:- (तिच्याजवळ जावून) आणि आपल्या? आपल्या मुलं,सुनांचं काय?

गार्गी:- म्हणजे?

देवेंद्र:- म्हणजे तू हे जे काम करतेस ते पुढे चालवायला कुणी नको का?

गार्गी:- कशावरून आपली मुलं माझे काम पुढे चालवतील? तुझ्यासारखी कलाकार, साहित्यिक, नाटकप्रेमी झाली तर?

देवेंद्र:- तुला आवडणार नाही?

गार्गी:- तसं नाही रे! पण आपलं काय ठरलंय, आपण दोघांनीही एकमेकांच्या कामात लुडबुड करायची नाही. मी कधी तुला विचारते का, आज कोणती कविता लिहिलीस, कुठल्या मासिकात काय छापून आलंय, कोणते नाटक बसवणार आहेस, नाटकाच्या तालमी कशा चालू आहेत?

देवेंद्र:- तेच तर दुर्दैव आहे ना ...

गार्गी:- म्हणजे माझ्याशी लग्न केलेस हे तुझे दुर्दैव ...

देवेंद्र:- तसे नाही गं. गंमत केली मी. मी खरे तर किती भारावून गेलो होतो तुझ्या कामाने तेव्हा. तुझा साधेपणा, करारीपणा, भारदस्त व्यक्तिमत्व सगळे आवडले होते मला. पण काय गं, तू कसा काय होकार दिलास मला? तुला काय आवडले माझे ? काय पाहिलेस तू माझ्यात?

गार्गी:- काय आवडले ते नक्की सांगता येणार नाही. पण आख्खा तूच मला आवडलास. तुझ्याकडे बघून असे वाटले की तू नक्की मला समजून घेशील. माझ्या कामाला प्रोत्साहन देशील.

देवेंद्र:- ते तर देतोच आहे. देतो आहे ना? पण आमच्या 'कामाला' प्रोत्साहन .... (जवळ जातो. ती दूर होते. तिचा हात धरतो. ) थोडे काही प्रात्यक्षिक?

गार्गी:- (दूर होवून) तो अभ्यास आहे माझा. गंमत बघायला नाही जात मी तिथे.

आणि तुझ्या प्रोत्साहन देण्याबद्दल म्हणशील तर खरंच अभिमान वाटतो मला तुझा ...

देवेंद्र:- अगं, नवरा आहे मी तुझा. तुझ्या प्रत्येक गोष्टीत सहभागी होणे हे कर्तव्य आहे माझे.

गार्गी:- ते खरे आहे रे पण असं वाटतंय, मीच कुठेतरी कमी पडतेय. मला खरोखरच हे घरसंसार, मुलेबाळे यात बिलकुल इंटरेस्ट नाही. कितीदा तरी मी नाराज केलय तुला. तुझ्याबरोबर तुझ्या मित्रांकडे जाणे, त्यांच्या बायकांशी गप्पा मारणे, पार्ट्यांना जाणे, नातेवाईकांशी मिळून मिसळून वागणे हे सारे कधी जमलेच नाही मला. तू समजून घेतोस सगळं. पण आता हेच बघ ना, आज आईबाबा आत्यांकडे गेले आहेत पण त्या आत्याना लग्न झाल्यापासून मी फक्त एकदाच भेटले होते. तुझ्या बायकोकडून खूप अपेक्षा आहेत लोकांच्या, त्या नाही मी पूर्ण करू शकत.

देवेंद्र:- माहित आहे गं सगळयांना तुझ्या मागे कामाचा किती व्याप असतो ते. आणि आता या गोष्टीची सवय पण झाली आहे सगळयांना.

गार्गी:- तू सुध्दा आपल्या सुखी संसाराची किती स्वप्न रंगवायचास सुरवाती सुरवातीला.

देवेंद्र:- स्वप्न ही स्वप्नच असतात गं शेवटी. सत्य हे नेहमीच वेगळं असतं.

गार्गी:- तुझी आणि तुझ्या आईबाबांची स्वप्नं मी पूर्ण करू शकत नाही. माझे विश्वच वेगळे आहे. झपाटून टाकलय मला त्याने. त्या झपाटलेल्या प्रदेशात मुक्त संचार

करण्यासाठी माझा जीव कासावीस होतो, व्याकुळतो. त्याची ओढ मला स्वस्थ बसू देत नाही.

देवेंद्र:- प्रत्येकाचेच तसे असते, गार्गी. प्रत्येकाचेच आपले आपले एक विश्व असते. जसे बेडकाचे असते तसेच गरुडाचेही. तू गरुड झेप घेण्याचा प्रयत्न करते आहेस माहित आहे. पण माझेही एक विश्व आहे, कलेचे, साहित्याचे. नवरा बायकोची कामाची क्षेत्र वेगळी असली तरी त्यांनी मनाने, शरीराने एकरूप व्हायला पाहिजे. माझे विश्व बांधल्या गेलेय तुझ्या विश्वाशी .

गार्गी:- बांधल्या गेलेय फक्त. पण आपली विश्वं मिसळून नाही गेलीत एकमेकात. बांधलेल्या गोष्टी मोकळ्या करता येतात, मिसळून गेलेल्या नाही.

देवेंद्र:- गार्गी, काय बोलतेस तू? अगं कितीही आणि काहीही झाले तरी आपण नवरा बायको आहोत. लग्नाच्या पवित्र बंधनात बांधल्या गेलो आहोत.

गार्गी:- तेच तर म्हणतेय ना मी की बांधलेल्या गोष्टी मोकळ्या करता येतात.

देवेंद्र:- ओह गॉड, काय करू मी? काहीच सुचत नाही मला. तिकडे आईबाबांना दुखावता येत नाही आणि इकडे तुझे हे असं. कसा सोडवता येईल हा तिढा?

गार्गी:- प्रयत्न केला की सगळ्या गोष्टी साध्य होतात. (एकदम भानावर येवून) चल. बोलत काय बसले मी! मला तयारी करायला हवी, सकाळी जायचय लौकर.

देवेंद्र:- अगं पण आईबाबा आले आहेत ना. आई तर किती भरभरून बोलत होती दुपारी. मांडीवर नातू खेळविण्याची स्वप्न रंगवत होती.

गार्गी:- मी सांगितलंय तुला एकदा. मला हे झेपणार नाही. एकदा मूल झाले की बायका बरोबर संसाराच्या जाळ्यात अडकत जातात.

(तेवढ्यात गार्गीचा फोन वाजतो)

गार्गी:- हैलो, अविनाश? हं ... बोल. हो, हो झाला थोडा वेळ मला येवून. काय? तू फोन केला होतास? कशाबद्दल? अच्छा, कधी आहे कार्यक्रम? बरं पण पुस्तकांचा खर्च

मात्र मी देणार आहे आणि आणखी एक इच्छा आहे माझी. त्यांच्यापैकी ज्या मुलांना दहावीला साठ टक्क्यांच्या वर मार्क्स असतील त्यांना माझ्याकडून बक्षीस जाहीर करायचय. दरवर्षीसाठी ... हो, उद्या सकाळी मी गडचिरोलीला जाणार आहे. येइलच तोपर्यंत. चल ठेवते.

गार्गी:- अविनाशचा फोन आला होता?

देवेंद्र:- हो. आपला हा वेगळाच विषय चालू होता, मी विसरलोच.

गार्गी:- अरे, अशी एवढी महत्वाची कामे विसरून कसे चालेल?

देवेंद्र:- होते असे कधी कधी, विसरलो असेन. आणि मी सांगितले होते त्याला एक तासाने फोन कर म्हणून. एवढं महत्वाचं बोलत होतो आपण. मी , माझे आईवडील, आपला संसार यापेक्षा जास्त महत्वाचे आहे का हे सगळे?

गार्गी:- बघ. तू पुन्हा त्याच विषयावर आलास.

देवेंद्र:- हो, कारण माझ्यासाठी तोच विषय महत्वाचा आहे. आणि आणखी एक सांगू?

गार्गी:- हं ... बोल, काय आणखी?

देवेंद्र:- अविनाशचे एक ठीक आहे. तो आपला विद्यार्थी होता, त्याचे आणि आपले घरच्या सारखे संबंध आहेत, पण मला वाटते की तू या राजकारणातल्या लोकांपासून थोडे दूरच रहायला हवे. अगं हे लोक कुणाचा कसा उपयोग करून घेतील ते कळत नाही.

गार्गी:- मला माहित आहे ते. जशी त्यांना माझी गरज आहे तशीच मला पण माझ्या कामासाठी त्यांची गरज आहे. मी फक्त त्यांच्याशी कामापुरताच संबंध ठेवते. लोकांशी वागतांना मी किती फटकून असते तुला माहित आहे.

देवेंद्र:- मला एवढंच म्हणायचय की साध्यासुध्या गोष्टीना तू एवढे महत्व देवू नये.

गार्गी:- आणि मी पण तुला सांगितलेय की माझ्यासाठी जास्त महत्वाचे काय आहे ते. तुला आणखी काय म्हणायचंय ते चांगलं समजतंय मला. पुन्हा एकदा सांगते तुला, मला मूल वगैरे नकोय..

देवेंद्र:- मूल नकोय तर लग्न का केलंस? तुझ्यासारख्या बायकांनी लग्नाच्या बंधनात अडकायला नकोच.

गार्गी:- तीच तर एक मोठी चूक झाली असे वाटायला लागले आहे आता. बाबा आधी काही म्हणायचे नाहीत पण, नंतर नंतर त्यांनी लग्नाचा ध्यासच घेतला होता माझ्या. आणि नेमका त्याच वेळी तू भेटलास.

देवेंद्र:- खरंच, योग तरी कसे जुळून येतात नाही? माझ्या एका नाटकाच्या कामासाठी मी तुमच्या समाजशास्त्र विभागात आलो आणि आपण भेटलो.

गार्गी:- मी तुझ्या स्वभावाने, वागण्याने भारावून गेले होते.

देवेंद्र:- आणि मी तुझ्या .... पण आता लक्षात येतंय, चूक दोघांकडूनही झाली आहे. तुला हे बंधन नको आहे, मूल नको, सासू सासरे, इतर नातेवाईक नकोत मग नवरा तरी कशाला पाहिजे?

गार्गी:- खरं आहे तुझं. बरोबर आहे. माझ्यासारख्या अशा झपाटलेल्या बाईने खरे तर लग्न करायलाच नको होते. देवेंद्र, जावू शकतोस तू ... जा ... मी तुला माझ्या बंधनातून मोकळे करायला तयार आहे. तुला पाहिजे तशा मुलीशी लग्न कर, सुखाने संसार कर. तुझी स्वप्नं पूर्ण होवू दे.

(आत जायला वळते)

देवेंद्र:- गार्गी, सॉरी, खरंच आय एम रिअली सॉरी. मला माहित आहे तू वाहून घेतले आहेस तुझ्या कामाला. पण ....

गार्गी:- अरे नाही. मी खरच रागावून नाही बोलले तुला. मनातून बोलले. नको अशी द्विधा अवस्था करून घेवूस मनाची. मला वाईट वाटणार नाही. निदान तू तरी सुखी होशील. माझ्यामुळे तू का असा होरपळतो आहेस?

देवेंद्र:- गार्गी, आता सध्या आपण दोघेही वेगळ्या मन:स्थितीत आहोत, आपण बोलू या विषयावर नंतर, निवांत, शांतपणे. अगं लग्न, संसार या गोष्टी आयुष्यात फक्त एकदाच होत असतात. संसाराचा डाव असा अर्ध्यावर नाही उधळून लावता येत.

गार्गी:- पण तुझ्या अपेक्षा मी नाही पूर्ण करू शकत. तुझी घुसमट कळते मला. मी तुला हवे ते सुख देवू शकत नाही.

देवेंद्र:- मला तू हवी आहेस गार्गी. मला छान सुखाचा संसार हवाय, मुलेबाळे नातवंडे यांनी घर भरून जायला हवंय. काहीतरी मार्ग काढून आपण यातून.

गार्गी:- नाही. मला तर वाटते आता गोष्टी जास्त ताणायला नकोत. माझा निर्णय झालाय. तूच नीट विचार कर. अरे आणि आपण भांडून वगैरे नाही वेगळे होत आहोत. तर नीट विचार करून, सामंजस्याने, एकमेकांची मने समजून घेवून एकमेकांना आपल्या बंधनातून मोकळे करत आहोत.

देवेंद्र:- तरी पण मला ...

गार्गी:- तू विचार कर. माझे म्हणणे पटेल तुला. चल मी जाते आता, मला उद्याची तयारी करायची आहे. आईबाबांना काय सांगायचे ते तू ठरव

(आत जाते. देवेंद्र अस्वथपणे फेऱ्या मारतो आहे. खूप विचार करतो आहे. तेवढ्यात त्याचा फोन वाजतो)

देवेंद्र:- हैलो, हं ... बोला बाबा. काय? आत्या सोडायला तयार नाही? तिथेच मुक्काम करताय रात्री? नाही. नाही. बाबा मला काहीही झालेलं नाही. छान आहे मी. गार्गी उद्या सकाळीच गडचिरोलीला जाणार आहे. बहुतेक तिची आणि तुमची भेट होणार नाही. बाबा .... बाबा ... आईच्या मनाची थोडी तयारी करा. आता

पुन्हा तिच्या आणि आत्याच्या गप्पा झाल्या असतील. नाही हो ... खरे तर मलाच खूप बोलायचे आहे तुमच्या दोघांशी. नाही, सांगितले ना, तसे काळजीचे काही कारण नाही. पण बरेच दिवस झाले, तुम्ही, मी, आई आपण बसून अशा गप्पा मारल्याच नाहीत. चर्चा केली नाही. अशा गप्पामधून, चर्चेमधून तर समस्यांची उकल होते, त्यावर उपाय सापडतो. मला समस्या? हं ... बोलू ना आपण उद्या. आईला सांभाळा. फार हळवी आहे ती. मनाला लावून घेते. बोलूच आपण उद्या भेटल्यावर. हो .... हो.... या सकाळी लौकर. नाहीतर मी येवू का तुम्हाला घ्यायला? रिक्षा करून येता सरळ? बरं ... बरं, चला ठेवतो.

(पुन्हा अस्वस्थ होवून चकरा मारतो आहे. हळू हळू अंधार )

(प्रवेश दुसरा समाप्त )

# <u>प्रवेश तिसरा</u>

(रंगमंचावर प्रकाश पडतो तेव्हा पुन्हा पहिलेच दृश्य. गार्गी खुर्चीवर बसलेली आहे. खूप विचारात आहे. मोहिनी तिच्याजवळच आहे. तिच्या हातात पाण्याचा ग्लास आहे. )

मोहिनी:- मॅडम, मॅडम कुठे हरवलात तुम्ही?

गार्गी:- मी ...? मी ना मी त्याच दिवशी हरवले ... कायमची. त्या दिवशी मी घरातून बाहेर पडले तेव्हाच. देवेंद्र, त्याचे आई वडील यांनी सगळयांनी मिळून चर्चा केली आणि तो दुसरीकडे रहायला गेला. तेव्हापासून मी शोधतीए स्वतःला. या माझ्या सगळ्या पसाऱ्यात.

मोहिनी:- मॅडम, तुम्हाला पश्चाताप होतोय का?

गार्गी:- नाही. मुळीच नाही. ज्या संसारात दोघांची मने एक झाली नाहीत तो संसार पुढे रेटण्यात काय अर्थ आहे?

मोहिनी:- म्हणजे तुम्ही समाधानी आहात तर ...

गार्गी:- हो ... माझ्या कामात मला समाधान मिळतंय. तेव्हापासून तर मी जास्तच मला या कामात झोकून दिलंय.

मोहिनी:- सर येतात कधी?

गार्गी:- फार कमी वेळा. क्वचित फोनवर बोलतो आम्ही. खरे तर आमचे तसे काहीच भांडण झालेले नाही. एकमेकांबद्दल मत्सर, हेवेदावे नाहीत. मने कलुषित नाहीत. पण ती एका प्रेमाच्या धाग्यात बांधलेली नसावीत बहुतेक. दोघांचा हेतू एकच आहे, दुसऱ्याला त्याची स्वतःची स्पेस मिळावी.

मोहिनी:- मग हे तुम्ही एकत्र राहून नाही करू शकत?

गार्गी:- हा प्रश्न मी मला स्वतःला सुध्दा बरेच वेळा विचारलाय. पण उत्तर एकच आलंय. नाही, नाही जमत हे सगळं. एकत्र राहिलो की बऱ्याच गोष्टी आम्हाला एकमेकात गुंतवून ठेवतात.

मोहिनी:- मॅडम, आपले काही चुकतेय असे नाही वाटत तुम्हाला?

गार्गी:- हं ... वाटलेही असेल एखाद वेळेस. बऱ्याच वेळा मी बघते, बायका अगदी नटून थटून त्यांच्या नवऱ्याबरोबर फिरायला जातात. हसतात, खिदळतात. हळदी कुंकवाला जातात. सणवार , मुलं बाळं, रुसवे फुगवे एन्जॉय करतात. पण ...

मोहिनी:- पण काय? तुम्हाला हेवा वाटतो त्यांचा?

गार्गी:- हेवा? एखादा क्षणभर वाटला असेलही. पण मला त्यांची कीव येते. असं कसं काही न करता सगळं आयुष्य घालवायचं?

मोहिनी:- पण सरांना आवडत असेल तर?

गार्गी:- तोच तर विचार मी आधी करू शकले नाही. पण आताशा मात्र हा विचार सारखा माझ्या मनात येतोय. त्याला जर या सगळ्या गोष्टींचा आनंद उपभोगायचा असेल, त्याला जर त्याच्या मनाप्रमाणे जीवन जगायचे असेल, त्याच्या स्वतःच्या, त्याच्या आईवडिलांच्या इच्छा पूर्ण करायच्या असतील तर मी का त्याच्या आड येवू? आणि त्यामुळेच मी ठरवलंय ...

मोहिनी:- काय ठरवलंय?

गार्गी:- त्याला मोकळं करायचं या बंधनातून. माझ्या या झपाटलेल्या जगात त्याचा श्वास नको गुदमरायला.

मोहिनी:- मॅडम, तुम्ही खरंच किती मोठ्या मनाच्या आहात.

गार्गी:- पण हे सगळे मी तुला का सांगतेय? काय झालंय मला आज? आत्तापर्यंत मी हे असे एवढे कधीच,कुणाबरोबरच बोलले नाही. आणि आज मी काय काय भरकटले कोण जाणे.

मोहिनी:- तुम्ही तुमचं मन मोकळं केलंत मॅडम.

गार्गी:- खरंच, मोकळं वाटतंय. तुझ्याकडे बघून मला एवढे सगळे का बोलावेसे वाटले कोण जाणे? पण तू माझी मुलाखत घ्यायला आली आहेस ना? मग मुलाखतीत हे असले काही ...

मोहिनी:- नाही मॅडम, सॉरी. (मोहिनी तिला वाकून नमस्कार करते) मी तुमची मुलाखत घ्यायला नाही आले. मी कोणत्याही मासिकात वगैरे काम नाही करत.

गार्गी:- मग? का आलीस तू इथे? कशाला आलीस? का एवढा वेळ घेतलास माझा? आणि मी ...? मी काय काय वेड्यासारखी बोलत सुटले.

मोहिनी:- माफ करा, मॅडम. मला तुमच्याशी बोलायचं होतं. खूप गप्पा मारायच्या होत्या. तुमच्या घराबद्दल, तुमच्या संसाराबद्दल आणि ...

गार्गी:- आणि काय? माझ्या संसाराचे वाभाडे बघायचे होते? कशासाठी? आणि कशाबद्दल माहिती पाहिजे होती तुला?

मोहिनी:- माहिती नाही. असंच बोलायचं होतं. सरांबद्दल ...

गार्गी:- देवेंद्रबद्दल? त्याचं काय?

मोहिनी:- स्पष्टच सांगते मॅडम. माझं प्रेम आहे सरांवर.

गार्गी:- काय? देवेंद्रवर ....? तुझं प्रेम? आणि त्याचं?

मोहिनी:- त्यांचंही माझ्यावर प्रेम आहे. आम्ही लग्न करणार आहोत. पण ....

गार्गी:- पण काय?

मोहिनी:- पण त्या आधी मला तुम्हाला भेटायचे होते. तुमच्याशी गप्पा मारायच्या होत्या. तसे कारण सांगून मी आले असते तर तुम्ही माझ्याशी बोलला असतात?

गार्गी:- नाही. मी अशी फालतू कुणाला भेटत नाही आणि बोलत नाही.

मोहिनी:- पण भेटायला, बोलायला येणारा माणूस काही महत्वाचे पण बोलणार असू शकतो. तो फालतूच बोलणार आहे कशावरून?

गार्गी:- कुणाला कशासाठी भेटायचंय आणि काय बोलायचंय हे मी आधीच थोडक्यात त्यांना विचारत असते.

मोहिनी:- हो. पण मी हे असे काही सांगू शकले नसते. म्हणूनच तर मी हा असा मुलाखत घेण्याचा पर्याय निवडला. माफ करा मला.

गार्गी:- तू इथे आलीस हे देवेंद्रला माहित आहे?

मोहिनी:- नाही. मी सरांना फक्त एवढेच सांगितले होते की मी तुम्हाला भेटणार आहे. कधी, कुठे, केव्हा ते नव्हते सांगितले. मला तुमचे मन दुखवायचे नव्हते. तुमच्या संसारात फूट पडावी अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. पण तुम्ही दोघे वेगळे का राहता, नेमकं तुमच्या दोघांत काय घडलंय, तुमचे संबंध कसे आहेत हे सगळं मला तुमच्या तोंडून ऐकायचं होतं. प्रत्यक्ष तुम्हाला भेटून. म्हणूनच गेले चार पाच दिवस मी तुमच्या घराभोवती घिरट्या घालत आहे.

(गार्गी एकदम थकून गेल्यासारखी वाटत आहे. ती एकदम थोडासा अनपेक्षित धक्का बसल्यासारखे वाटून खुर्चीवर बसते. )

मोहिनी:- रागवलात मॅडम ...?

गार्गी:- नाही गं..... !

मोहिनी:- खूप थकल्यासारख्या वाटताय.

गार्गी:- नाही ... नाही. बरी आहे मी.

मोहिनी:- मी कॉफी करून आणू तुमच्यासाठी गरम ... गरम. कडक ...

गार्गी:- देवेंद्रही असाच म्हणायचा. तुझ्यासाठी कॉफी करून आणतो. गरम ... गरम. कडक ...

मोहिनी:- काही म्हणालात?

गार्गी:- नाही ... अं ... तू कशाला? मावशी करतील ना. तुला कुठे सामान माहित आहे सगळं ...

मोहिनी:- मावशीना नको. मीच करेन. सामान नाही सापडले तर विचारेन त्यांना. आणि आणखी एक, तुम्ही जर खरच रागवला नसाल तर माझ्या हातची कॉफी प्याल. करून आणू? जावू?

गार्गी:- जा ... आण. आयती कॉफी हातात मिळाली तर नक्कीच आवडेल.

(मोहिनी कॉफी करण्यासाठी आत गेली आहे. गार्गी तशीच खुर्चीवर बसलेली आहे. मंद, शांत संगीत. तेवढ्यात दारावरची बेल वाजते. )

गार्गी:- आता आणखी कोण आलंय या वेळी?

(दार उघडते. देवेंद्र आत येतो.)

गार्गी:- देवेंद्र तू?

देवेंद्र:- हो. मीच. आश्चर्य वाटलं का मला बघून?

गार्गी:- अचानक कसा काय आलास? फोन पण केला नाहीस. किती दिवस झाले नाही आपल्याला भेटून? कसा आहेस?

देवेंद्र:- मी बरा आहे. मी एक दोनदा फोन केला होता तुला. घरचाही फोन कुणी उचलला नाही. मोबाईल पण आउट ऑफ रेंज होता. मी तुला मेसेजही केला होता. पण तू काहीच उत्तर दिले नाहीस. तू नसशील कदाचित इथे. कशी आहेस?

गार्गी:- बरीच आहे म्हणावे लागेल.

देवेंद्र:- का गं? अशी का बोलतेस? अशी भाषा तुझ्या तोंडात शोभत नाही. आता तर काय, आंतरराष्ट्रीय स्तरावर तुझ्या कार्याची दखल घेतली जाणार.

गार्गी:- हो. चालूच आहे माझे  काम. आता तर काय, क्षणाचीही उसंत नाही. त्यात पुन्हा लोकांचे सारखे फोन, पेपरमधे बातम्या, मुलाखती, सुरूच आहे. आत्ता सुध्दा एक मुलगी आली आहे मुलाखत घ्यायला. पण हे मुलाखत घेणारे थोडा प्रॉब्लेम करतात.

देवेंद्र:- का बरं? आता काय प्रॉब्लेम झालाय?

गार्गी:- अरे लोकांना ना माझ्या या सामाजिक कार्यापेक्षा माझ्या खासगी, घरगुती गोष्टींमधेच जास्त इंटरेस्ट आहे. सारखे तुझ्याबद्दल खोदून खोदून प्रश्न विचारीत असतात.

देवेंद्र:- मग तू काय सांगतेस?

गार्गी:- सांगण्यासारखे तसे काय आहे? आपले काही भांडण थोडेच झालेय? आपण फक्त वेगळे राहतो.

देवेंद्र:- फक्त? फक्त वेगळे राहतो? गार्गी, नवरा बायकोने असे वेगळे राहणे, याचा अर्थ माहित आहे तुला? लोक काय काय अर्थ काढतात.

गार्गी:- मला लोकांची पर्वा नाही.

देवेंद्र:- पण मला आहे. मी आज इथे आलोय ते खास तुझ्याशी काहीतरी बोलण्यासाठी. मी तुला मेसेजमध्ये पण लिहिले होते तसे, महत्वाचे बोलायचे म्हणून.

गार्गी:- एवढं काय विशेष? काय प्रेमा बिमात पडलास की काय कुणाच्या?

देवेंद्र:- कशावरून?

गार्गी:- तुझ्यासारख्या सुंदर, रसिक प्राध्यापका भोवती नेहमीच मुलींचा गराडा असतो, माहित आहे मला. कुणी ‘मोहिनी’  घातली की काय?

(चमकून तिच्याकडे पाहतो)

देवेंद्र:- गार्गी, ... तू ... तुला ...?

(तेवढ्यात मोहिनी कॉफी घेवून येते. )

देवेंद्र:- तू …? तू इथे कशी काय?

गार्गी:- ती माझी मुलाखत घ्यायला आली आहे. मी आत्ताच म्हटलं नाही का तुला, एक मुलगी माझी मुलाखत घ्यायला आली आहे म्हणून?

देवेंद्र:- अगं पण ही. …

गार्गी:- तू ओळखतोस हिला?

देवेंद्र:- हो. मी तुला तेच तर सांगायचा प्रयत्न करत होतो पण …

गार्गी:- पण काय?

देवेंद्र:- तुझ्याशी कुठे आणि कसा संपर्क करावा तेच कळत नव्हते. तू सतत बिझी आणि बाहेर कुठेतरी असायचीस. मी म्हणजे आम्ही लग्न करणार आहोत.

गार्गी:- मला कळलंय सगळं.

(देवेंद्र मोहिनीकडे बघतो)

मोहिनी:- मीच सांगितलंय त्यांना. मॅडम कॉफी घेताय ना?

गार्गी:- आणखी एक कप आण. यातलीच थोडी थोडी देवू त्याला.

(मोहिनी आत जावून कप आणते).

गार्गी:- छान झाली आहे कॉफी. अगदी मला आवडते तशी.

मोहिनी:- आवडली तुम्हाला?

गार्गी:- हो. कॉफी तर आवडलीच. पण-

मोहिनी:- पण काय?

गार्गी:- -पण तू सुध्दा आवडलीस. तुझा आशावाद फार दुर्दम्य आहे मोहिनी. आणि तुझ्यात काहीतरी जादू आहे. म्हणूनच मी तुझ्याशी एवढी घडाघडा बोलले. मोकळेपणाने. तुझ्याशी लग्न करून देवेंद्र नक्कीच सुखी होईल.

देवेंद्र:- गार्गी. आय एम सॉरी … मी तुला ….

गार्गी:- अरे, सॉरी का म्हणतोस? तू काही मला फसवले नाहीस. आणि ही मोहिनी

दुसऱ्याच्या मनातले बरोबर काढून घेण्यात खूप हुषार आहे.

मोहिनी:- रागावलात मॅडम? माझ्या या कृत्त्याबद्दल, खोटेपणाबद्दल?

गार्गी:- छे … छे. उलट कौतुक वाटले तुझे. तुझ्यासारख्या बायका संसार छान करतील. तू सुध्दा तुझे स्वतःचे एक विश्व निर्माण केले असशील. तुझीही काही स्वप्ने असतील. आणि तुझे विश्व, तुझी स्वप्ने ही देवेंद्राच्या विश्वाशी त्याच्या स्वप्नांशी मिळती जुळती असणार नक्कीच. म्हणून तर …

मोहिनी:- माफ करा मॅडम, मला … मी …

गार्गी:- अगं, एवढी का अपसेट झाली आहेस? आणि मी हे जे काही बोलतेय ना ते अगदी मनातून बोलतेय. तुला हिणवायचा किंवा खजील करायचा मुळीच उद्देश नाही माझा. (हसत हसत) पण ती मुलाखत कुठे प्रसिध्द होणार नाही हे नक्की ना?

मोहिनी:- नाही होणार मॅडम… नक्की. (पुन्हा एकदा नमस्कार करते ) येवू मी?

गार्गी:- अगं, तशी कशी जातेस? काहीतरी गोड हातावर ठेवते तुमच्या.

(आतून मिठाई आणून दोघानाही देते. देवेंद्र मिठाई घ्यायला जातो आणि पुन्हा हात मागे करतो )

गार्गी:- घे रे. तुला मिठाई आवडते माहित आहे मला.

(मिठाई घेवून मोहिनी जायला निघते. तिच्यामागोमाग देवेंद्र पण निघाला आहे. ते दारापर्यंत जातात तोच.)

गार्गी:- आणि हो … देवेंद्र, आणखी एक महत्वाचं.

(देवेंद्र मोहिनीला 'तू पुढे जा, मी आलोच' अशी खुण करून परत आत येतो.)

गार्गी:- (तिचा आवाज कातर आणि हळवा झालाय) काही नाही, ते डिव्होर्स पेपर लौकर पाठव. मी सह्या करून देते.

(दोघेही जातात. गार्गी थोडावेळ सुन्न होवून, दोन्ही हातात डोके धरून खुर्चीत बसते. थोडावेळ शांतता. मंद संगीत )

गार्गी:-     काय झाले मला? मी ते केले ते बरोबर केले ना? मग असे अचानक हातातून काहीतरी निसटून गेल्यासारखे का वाटते आहे?

(तेवढ्यात तिचा फोन वाजतो )

गार्गी:-     हैलो ... डॉ. गार्गी पुराणिक हिअर ... हो... हो. झालंच आहे. अहवाल लिहून तयार आहे सगळा. आता फक्त एकदा शेवटची नजर फिरवायची आणि टाईप करायचा. हो ... होईल ना. खरे तर आता आपल्याजवळ वेळ खूपच कमी आहे, नाही का? खरंच की ... ही  काय, कामालाच लागले आता ... (फोन ठेवते.)

बाप रे ...! कित्ती कामं पडली आहेत अजून.

(भराभरा पुस्तके उघडते. लॅपटॉप बघते. टाईप करायला सुरवात करते.)

(पडदा पडतो )

--समाप्त--

# नंदिनी देशमुख



नंदिनी देशमुख यांना ई साहित्यचे वाचक "हा छंद जिवाला" या एकांकिकेच्या लेखिका म्हणून ओळखतात. मूळच्या त्या नांदेडच्या. त्यांना लहानपणापासूनच लेखनाची आणि वाचनाची आवड होती. मग १९७७-७८ पासून त्यांनी लेखनास प्रारंभ केला. गेल्या पस्तीस वर्षांत अनेक मासिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरून त्यांचे नभोनाट्य आणि ऐतिहासिक लेखन प्रसारित करण्यात आले. कथाश्री, आवाज, स्नेहप्रभा इ. दिवाळी अंकामधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या. सकाळ कथा विशेषांक २००९ मध्ये त्यांच्या 'प्रमोशन' या कथेला प्रथम पारितोषक मिळाले. लोकसत्ता, सकाळ मधून त्यांनी विविध प्रकारचे लेखन केले. दैनिक प्रजावाणी नांदेड, दैनिक उद्याचा मराठवाडा, नांदेड या वर्तमानपत्रामधून त्यांनी सदर लेखन केले.

महाराष्ट्र राज्य नाट्य परिषद नांदेड शाखेतर्फे 'अनुवंश' आणि 'मी रचना देसाई' या त्यांच्या नाटकांचे प्रयोग करण्यात आले. कामगार कल्याण मंडळ स्पर्धेत 'तुमच्यासारख्या तुम्हीच' या त्यांनी लिहीलेल्या एकांकिकेला प्रथम पारितोषक मिळाले. २००४ मध्ये 'औट घटकेची राणी' ही कादंबरी आणि २०१० मध्ये निरनिराळया मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या कथांचा 'कुंपणाच्या पलीकडे' हा कथा संग्रह प्रकाशित झाला.

हे सर्व लेखन करत असतानाच त्या नोकरीदेखिल करत होत्या. भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई येथून लेखाधिकारी या पदावरून निवृत्त झाल्या.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांसाठी त्यांनी "हा छंद जिवाला..." आणि "आज अचानक..." या एकांकिका विनामुल्य दिल्याबद्दल वाचकांच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो.

हे पुस्तक कसं वाटलं ते नक्की कळवा.

टीम ई साहित्य

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली. नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व सव्वा दोन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2.	ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3.	आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन काम.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान